<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

**वाचा :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.१३/०९/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६१/२०११/जा.७४२, दिनांक १४/०९/२०११, ०१/१०/२०११, १४/१०/२०११ व ०९/११/२०११.
३) तपासी पोलिस अधिकारी तथा सपोनि नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दि.२६/०९/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.
४) तपासी पोलिस अधिकारी तथा सपोनि नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दि.१७/१०/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.
५) धर्मराज आर. दुबे यांचे दि.१८/१०/२०११ राजीचे लेखी निवेदन.
६) शिव रोड लाईन्सचे मालक तसेच टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे वाहतूकदार धर्मराज रामकेदार दुबे यांचे दि.२२/११/२०११ राजीचे लेखी निवेदन.
७) तपासी पोलिस अधिकारी तथा सपोनि नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दि.२८/११/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६१/२०११/जा १०५१
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ३१/१२/२०११

## <u>आदेश</u>

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**<u>प्रकरणाची पार्श्वभूमी :-</u>**

दिनांक ०७/०९/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, आय.ओ.सी., वाशी टर्मिनल, नवी मुंबई येथील गाडी चेकींग समोरील गेट येथे रात्रौ ठिक ०७:४५ वाजता पोहचले. थोडा वेळ निरिक्षण केले असता, एक टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ मधून टँकरच्या मागल्या बाजूस असलेल्या कप्पा क्रमांक ४ मधून दोन इसमं लोखंडी टॉमी व प्लॅस्टिकच्या पाईपने टँकरमधील डिझेल त्याच्या टँकर इंधन टाकीमध्ये भरत असल्याचे निदर्शनास आले, पंचाना इशारा करुन घाईने टँकरजवळ पोहचले असता, सदरच्या दोन्ही इसम अंधाराचा फायदा घेऊन मागील बाजूने पळून गेले.

त्यामुळे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गाडीच्या कॅबिनची पहाणी केली असता, गाडीमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, वाशी येथून चलन क्रमांक ६४९०७१५६५, दि. ०७/०९/२०११ अन्वये साधारण दुपारी २:५० वाजताच्या सुमारास १२००० लिटर डिझेल भरण्यात आल्याचे आढळून आले. सदर चलनानुसार गाडीमधील डिझेलचे वितरण मे. इन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., बी-११, एम.आय.डी.सी., तारापूर, टी.एम.आर.सी.टी. हॉस्पीटल जवळ, तारापुर, जिल्हा ठाणे, पिन क्र. ४०१५०६ या ठिकाणी त्यावयाचे होते. यावरुन घटनास्थळी उभा असलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा डिझेल वितरणासाठी टँकरचे चालक व क्लिनर यांनी लगेच न नेता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन वाशी टर्मिनल येथील गाडी पार्कींग समोरील गेट बाहेर उभा करुन टँकरच्या वरील कप्पा क्र. ४ मध्ये टॉमी व प्लॅस्टिक पाईपद्वारे त्याच टँकरच्या इंधन टाकीमध्ये अनधिकृतपणे डिझेल भरत असल्याचे निदर्शनास आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन शासनाचे अनुदानित दराचे डिझेल उपभोक्त्याला पूर्णपणे न देता त्यांची व शासनाची फसवणूक करुन सदरच्या टँकरमधून डिझेल चोरी करुन त्याच टँकरच्या इंधन टाकीमध्ये अनधिकृतपणे डिझेल भरत असल्याचे निदर्शनास आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ तसेच (२) दि मोटार स्पिरीट ॲन्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रिब्युशन ॲण्ड प्रिव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) आदेश २००५ चे कलम ३, ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द नेरुळ पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६५/२०११, दि.०८/०९/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ | १ नग | ५,००,०००/- |
| २ | उक्त टँकरमधील डिझेल साठा (पाईपद्वारे काढण्यात आलेला अंदाजे २०० लिटर साठा वजा जाता येणारा साठा) | ११८०० लि. | ५,१२,४९२/- |
| ३ | लोखंडी टॉमी | १ नग | १००/- |
| ४ | प्लॅस्टिक पाईप | १ नग | १००/- |
| | | एकूण | १०,१२,६९२/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, नेरुळ पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६५/२०११, दि.०८/०९/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ

0002

नये ? याबाबत वाचा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे-दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि. २६/०९/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस नेरुळ पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा स.पो.नि. श्री. ओ.अे. गोसावी हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस धर्मराज दुबे हे उपस्थित होते व त्यांनी त्यांचा मुलगा निरज धर्मराज दुबे यांच्या नावे टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ असल्याचे सांगितले. धर्मराज दुबे यांस सदर टॅंकरचे नोंदणीचे कागदपत्र पुढील सुनावणीस सादर करण्याच्या सुचना दिल्या. तसेच सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित नव्हते. सबब, पुढील सुनावणी दि.११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस धर्मराज दुबे हे टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ च्या मालकाच्या वतीने उपस्थित होते. त्यांना पुढील सुनावणीस टँकर मालकाच्या वतीने पुढील सुनावणीस प्राधिकारपत्र व टँकरच्या कागदपत्रांसह उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या. तसेच सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित नव्हते. सबब, पुढील सुनावणी दि.१८/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा स.पो.नि. श्री. अे.अे. गोसावी हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस टँकर क्र.[illegible]-०४-एएल-१४९९ चे मालक निरज धर्मराज दुबे यांच्यावतीने प्राधिकारपत्रासह धर्मराज दुबे यांनी उपस्थित राहून त्यांनी [illegible] वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित नव्हते.

दि.[illegible]/०९/२०११ रोजी आय.ओ.सी., वाशी टर्मिनल येथून टँकर भरुन गेल्याचे त्या दिवसभराचे वितरक/ट्रान्सपोर्टनिहाय तपशिल प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित कंपनीस पत्र निर्गमित करण्यात आले.

[illegible]. आय.ओ.सी., वाशी टर्मिनल येथे या कार्यालयातील फिरते पथकातील शिधावाटप निरिक्षक यांनी जाऊन अहवाल प्राप्त करुन घेतला. सदर अहवालानुसार सदर डिझेल साठ्याचे उपभोक्ता मे. इंड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., तारापूर असून वाहतूकदार मे. शिवम रोडलाईन्स असल्याचे आढळून आले. सबब, उपभोक्ता व वाहतूकदार तसेच यापूर्वीचे सुनावणीस अनुपस्थित इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दि. २२/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस शिव रोड लाईन्सचे मालक तसेच टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे वाहतूकदार धर्मराज रामकेदार दुबे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये त्यांचे लेखी निवेदन

सादर केले. टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे चालक अनिलकुमार यादव हे सदर सुनावणी उपस्थित राहिले. इतर आरोपी/अपचारी सदर सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तीवाद :-**

दिनांक २६/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित नेरुळ पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा स.पो.नि. श्री. अे.अे. गोसावी यांनी युक्तीवाद केला की, गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आलेला मोटार टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ व त्यामध्ये १२ हजार लिटर डिझेल असून सदरचा टँकर पोलिस ठाणे समोर रस्त्यावर उभा करण्यात आलेला आहे व त्यामधील डिझेल हे ज्वलनशिल असून जास्त दिवस ठेवणे धोकादायक आहे. तरी मोटार टँकर व त्यामधील डिझेलबाबत विल्हेवाट लावण्याची योग्य आदेश होणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित नेरुळ पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा स.पो.नि. श्री. अे.अे. गोसावी यांनी युक्तीवाद केला की, नमूद गुन्ह्यातील चालक यास दि.१८/०९/२०११ रोजी अटक केली असून त्यास मा. न्यायालयाने जामिनावर मुक्त झाल्यानंतर पोलिस ठाण्यास प्रत्येक गुरुवारी हजेरी देणेबाबत कळविले असून तो अद्याप हजर झालेला नाही. सदर टँकरवरील क्लिनरबाबत चालक अगर मालक काहीच माहिती देत नसून त्यास अद्याप अटक केली नाही. कारणे दाखवा नोटीस टँकरचा मालक घेण्यासाठी हजर झाला नसून त्याचे वडील धर्मराज दुबे यांना नोटीसची बजावणी करण्यात आली आहे. इंन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., तारापूर यांना नोटीसची बजावणी न करता सदरचे नोटीस वाशी टर्मिनलचे टर्मिनल मॅनेजर यांचेशी संपर्क करुन त्यांच्या कार्यालयात नोटीस बजावणी करण्यात आलेली आहे आणि सदर नोटीसाचे उत्तर टर्मिनल मॅनजेर फॅक्सद्वारे आपल्या कार्यालयास पाठविणार असल्याचे सांगितले आहे. गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आलेला मोटार टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ व त्यामधील ११,८०० लिटर डिझेल असून सदरचा टँकर पो. ठाण्यासमोर रस्त्यावर उभा करण्यात आला आहे व त्यामधील डिझेल हे ज्वलनशिल असून जास्त दिवस ठेवणे धोकादायक आहे. तरी मोटार टँकरमधील डिझेलबाबत विल्हेवाट लावण्याचे आदेश होण्यास विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दि.१८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित धर्मराज दुबे यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या चालकाने सांगितल्यानुसार मुद्देमालबाबतचे पेपर, गाडी क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे पूरे पेपर्स व मालाचे चलान गाडी मध्येच होते. जे आता केस केलेल्या अधिकाऱ्यांच्या जवळ आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित शिव रोड लाईन्सचे मालक तसेच टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे वाहतूकदार धर्मराज रामकेदार दुबे यांनी युक्तीवाद केला की, टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा टँकर त्याचा मुलगा निरज धर्मराज दुबे यांचे नावे असून त्यांनी त्याचे नावे न्यायालयीन मुक्त्यार पत्र लिहून दिलेले आहे. परंतू आपले कार्यालया तर्फे नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार त्याचे फर्मचा नमूद टँकर हा मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई याचे ताब्यात आहे. तो इंडियन ऑईल कंपनीचा अधिकृत कॉन्ट्रॅक्टर असले कारणाने सदरहू टँकरमधील उर्वरित असलेले डिझेल त्याला कंपनीच्या टर्मिनलमध्ये जमा करावयाचे आहे. सदरहू डिझेल जमा केल्यानंतर त्याला संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात असलेला त्यांचा टँकर पुन्हा ताब्यात देण्यात यावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले. तसेच मे. शिव रोड लाईन्स यांचा वाहतूकदार म्हणून मे. आय.ओ.सी. या तेल कंपनी सोबत दि.०८/१२/२००८ रोजीचा वाहतूक करारनाम्याची छायांकित प्रत सादर केली.

नेरुळ पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा स.पो.नि. श्री. अे.अे. गोसावी यांचे दिनांक २८/११/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, मे. इंन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., बी-११, एम.आय.डी.सी., तारापूर, जि. ठाणे यांना सदर नोटीसाची फॅक्सद्वारे बजावणी करण्यात आलेली असून सदर कंनीतील सुरेश नावाच्या इसमांशी फोनद्वारे चर्चा केली असता त्यांनी सांगितले आहे की, इंडीयन ऑईल कंपनीने सदर कंपनीस दुसऱ्या दिवशी माल पोहचवला आहे. त्यामुळे सदर मालाबाबत वरील कंपनीचा संबंध नसल्याचे कळविले आहे. तसेच इंडियन ऑईल कंपनीचे टर्मिनल मॅनेजर हर्षवर्धन यांचेशी समक्ष चर्चा केली असता त्यांनी कळविले आहे की, मे. इंन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि. या कंपनीला पाठविलेला माल वेळेत न पोहचल्याने कंपनीने ट्रान्सपोर्टर कडून सदर मालाचे पैसे वसूल केले असून त्या पैशातून मे. इंन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि. या कंपनीला दुसऱ्या दिवशी दुसरा टँकर पाठविण्यात आलेला आहे, असे तोंडी उत्तर देवून लेखी उत्तर देण्यास त्यांनी नकार दिला आहे. तरी सदर गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आलेला मोटार टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ व त्यामधील ११,८०० लिटर डिझेलबाबत विल्हेवाट लावण्याचे आदेश तातडीने होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०७/०९/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, आय.ओ.सी., वाशी टर्मिनल, नवी मुंबई येथील गाडी चेकींग समोरील गेट येथे रात्रौ ठिक ०७:४५ वाजता टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ मधून टँकरच्या मागल्या बाजूस असलेल्या कप्पा क्रमांक ४ मधून दोन इसम लोखंडी टॉमी व प्लॅस्टिकच्या पाईपने टँकरमधील डिझेल त्याच्या टँकर इंधन टाकीमध्ये भरत असल्याचे निदर्शनास आले. सदरच्या दोन्ही इसम अंधाराचा फायदा घेऊन मागील बाजूने पळून गेले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गाडीच्या कॅबिनची पहाणी केली असता, गाडीमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, वाशी येथून चलन क्र. ६४९०७१५६५, दि.०७/०९/२०११ अन्वये साधारण दुपारी २:५० वाजताच्या सुमारास १२००० लिटर डिझेल भरण्यात आल्याचे आढळून आले. सदर चलनानुसार गाडीमधील डिझेलचे वितरण मे. इन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., बी-११, एम.आय.डी.सी., तारापूर, टी.एम.आर.सी.टी. हॉस्पीटल जवळ, तारापुर, जिल्हा ठाणे, पिन क्र. ४०१५०६ या ठिकाणी न्यावयाचे होते. यावरुन घटनास्थळी उभा असलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा डिझेल वितरणासाठी टँकरचे चालक व क्लिनर यांनी लगेच न नेता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन वाशी टर्मिनल येथील गाडी पार्कींग समोरील गेट बाहेर उभा करुन टँकरच्या वरील कप्पा क्र. ४ मध्ये टॉमी व प्लॅस्टिक पाईपद्वारे त्याच टँकरच्या इंधन टाकीमध्ये अनधिकृतपणे डिझेल भरत असल्याचे निदर्शनास आले. अशाप्रकारे सदर टँकर व त्यामधील डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ मध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, वाशी या तेल कंपनीतून भरलेले १२००० लिटर्स डिझेल हे मे. इन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., बी-११, एम.आय.डी.सी., तारापूर, टी.एम.आर.सी.टी. हॉस्पीटल जवळ, तारापुर, जिल्हा ठाणे, पिन क्र. ४०१५०६ येथे जावून वितरण करणे आवश्यक असल्याचे घटनास्थळी आढळून आलेल्या चलन क्र. ६४९०७१५६५, दि.०७/०९/२०११ वरुन दिसून येते. तथापी, सदर टँकर नियोजीत ठिकाणी न जाता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, आय.ओ.सी., वाशी टर्मिनल, नवी मुंबई येथील गाडी चेकींग समोरील गेट येथे घटनास्थळी आणून त्यातील डिझेलचा साठा टँकर चालकाने स्वार्थासाठी गैरव्यवहाराने काढीत असतांना अधिकाऱ्यांना आढळून आले आहे. तसेच घटनास्थळी सदर टँकरचे झाकन लोखंडी टॉमीने उघडून डिझेल पाईपद्वारे टँकरमधुन काढून त्याच टँकरच्या इंधन टाकीमध्ये डिझेल भरल्याचे आढळून आले आहे. तपासी पोलिस अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अभिवेदनात जप्त टँकरचे चालक यांनी तपासणी मध्ये क्लिनर बाबत काहीच माहिती दिली नाही तसेच टँकरचे चालक यांनी सुनावणीस उपस्थित राहुन त्यांचे लेखी निवेदन सादर केले नसुन व टँकरचे मालक व क्लिनर यांना संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन टँकर चालक, क्लिनर व मालक यांनी संगनमताने सदरचा टँकर नियोजीत स्थळी न नेता, स्वत:च्या आर्थिक

फायद्यासाठी घटनास्थळी नेवून त्यामधील डिझेल गैरमार्गाने काढून त्याच टँकरच्या इंधन टाकीमध्ये भरला असल्याने त्यांचा बेकायदेशिर कृत्याबाबतचा उद्देश सिध्द होतो. तसेच सदर डिझेल साठयाचे उपभोक्ता मे. इन्ड्रोक्स ग्लोबल प्रा.लि. या कंनीतील सुरेश नावाच्या इसमांशी पोलिसांनी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असतां त्यांना इंडीयन ऑईल कंपनीने त्यांच्या कंपनीस दुसऱ्या दिवशी डिझेलचा साठा पोहचवला असल्याचे सांगितले आहे. सबब, जप्त करण्यात आलेला टँकरमधील संपूर्ण डिझेलचा साठा ज्या कंपनी मधून भरण्यात आला होता त्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., वाशी, नवी मुंबई यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. शिव रोड लाईन्स यांना आय.ओ.सी. कंपनीने डिझेल व पेट्रोल या पेट्रोलियम पदार्थाच्या उपभोक्ताना पुरवठा करण्याकरिता करारबध्द केल्याचे दिसून येते. सदरहू गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा वाहतूकदार धर्मराज दुबे यांच्या मुलाच्या नावे असून या व्यतिरिक्त कोळसेवाडी पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. I ५७/२०११ दि.०३/१०/२०११ अन्वये जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ हा वाहतूकदार धर्मराज दुबे यांच्या स्वतःच्या मालकीचा असून सदर दोन्ही गुन्हा नोंद प्रकरणात नमूद टँकरमधील डिझेलचा साठा उपभोक्तास पुरवठा करण्यापूर्वी गैरमार्गाने डिझेल काढताना आढळून आले आहे. यावरुन मे. शिव रोड लाईन्स या वाहतूकदाराने मे. आय.ओ.सी. कंपनीची विश्वासार्हता गमावल्याचे निषन्न होत आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे वाहतूकदार तसेच शिव रोड लाईन्सचे मालक धर्मराज रामकेदार दुबे यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाश्यात टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा टँकर त्याचा मुलगा निरज धर्मराज दुबे यांचे नावे असून त्यांनी त्याचे नावे न्यायालयीन मुक्त्यार पत्र लिहून दिले असल्याचे सांगुन संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात असलेला त्यांचा टँकर पुन्हा ताब्यात देण्यात यावा असे सांगितले आहे. तथापी, टँकर मालक व क्लिनर यांना सुनावणीस उपस्थित राहाण्याची संधी देवून देखील ते उपस्थित राहीले नाहीत. तसेच टँकरचा चालक याने सुनावणीस उपस्थित राहुनही लेखी निवेदन सादर केलेले नाही. यावरुन त्यांना सदरचे आरोप मान्य असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधितांनी जप्त टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ मधील डिझेलचा साठा प्रत्यक्षात उपभोक्तास न देता स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी गैरमार्गाने सदर टँकरमधील डिझेलचा साठा काढून त्याच टँकरमधील इंधन टाकीमध्ये भरीत असल्याचे आढळून आल्याने त्यांनी उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकाच्या अपरोक्ष जरी चालक व क्लिनर यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास

टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेल्या टँकरच्या इंधन टाकीमधील डिझेलचा साठा तसेच त्याकरीता वापरण्यात आलेली लोखंडी टॉमी, प्लॅस्टिक पाईप इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नेरुळ पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६५/२०११, दि.०८/०९/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश :-</u>**

१) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

२) अथवा टँकरचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे टँकर लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील संपुर्ण डिझेलचा साठा, ज्या कंपनीमधून भरलेला आहे त्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., वाशी टर्मीनस, नवी मुंबई यांच्याकडे पोलीसांनी क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करावा.

४) घटनास्थळी आढळून आलेल्या टँकरच्या इंधन टाकीमधील डिझेलचा साठा शासनजमा करण्यात यावा. सदर डिझेल साठ्याची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले लोखंडी टॉमी व प्लॅस्टिक पाईप इ. वस्तू शासनजमा करण्यात याव्यात. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0008

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे चालक

२) टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे क्लिनर

३) टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ चे मालक

४) मे. इंड्रोक्स ग्लोबल प्रा.लि., बी-११, एम.आय.डी.सी., तारापूर, टी.एम.आर.सी.टी. हॉस्पीटल जवळ, तारापूर, जिल्हा ठाणे, पिन क्र. ४०१५०६

५) शिव साई लाईन्स, टँकर क्रमांक एमएच-०४- एएल -१४९९ चे वाहतूकदार

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरुळ पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., वाशी टर्मीनल, नवी मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.